# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0143 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/03/2023 20:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 09/03/2023

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/03/2023

**Time From (वेळेपासून):** 13:04 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/03/2023 **Time (वेळ):** 19:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 033

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/03/2023 19:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार ,रूग्णालय कोल्हापूर येथील नर्मद, बिल्डींग मधील पहिल्या मजल्यावर,जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुरेखा शिवाजी धुंडगेकर
(b) **Husband's Name (पती चे नाव) :** शिवाजी धुंडगेकर
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 104,गुरप्रसाद हाईटस,नागाळा पार्क,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 104,गुरप्रसाद हाईटस,नागाळा पार्क,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9403601618

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हुसेनबाशा कादरसाब शेख | | वडील का नाम : कादरसाब शेख | 1. नागोबा मंदिराचे मागे,शनिवार पेठ, ,कोल्हापूर,लक्ष्मीपूरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 09/03/2023

मी सौ सुरेखा शिवाजी दुंडगेकर वय.47 वर्षे, व्यवयसाय - नोकरी अधिपरिचारिका सी.पी.आर हॉस्पीटल कोल्हापूर रा. फ्लॅट नं. 104 गुरप्रसाद हाईटस, नागाळा पार्क, कोल्हापूर मो.नं. 9403601618 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

मी दिनांक 09/03/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक श्री. सरदार नाळे यांचेसमक्ष हजर राहुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करणेकरीता पोलीस उपअधीक्षक सरदार नाळे यांनी लागलीच पोलीस निरिक्षक कुंभार साहेब यांना पुढील कार्यवाही करणेबाबत सांगितले त्यानंतर लागलीच कुंभार साहेब यांनी शासकीय पंच उपलब्ध करून घेतले व अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूरच्या कार्यालयात माझी व दोन्ही पंचाची एकमेकांशी ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी तक्रार सांगीतली की,

मी दि.25/06/2008 रोजी अधि.परिचारीका पदावर पाटण जि.सातारा येथे नोकरीस लागले. माझी बदली सन 2018 मध्ये सीपीआर हॉस्पीटल येथे झाली सध्या मी सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर येथील नेत्र विभागामध्ये अधि.परिचारीका पदावर कार्यरत आहे. मला नोकरीतील पुढील लाभ मिळणेकरिता स्थायित्व प्रमाणपत्राची आवश्यकता होती. त्याकरिता मी, मा. जिल्हा शल्यचिकित्सक सीपीआर रूग्णालय कोल्हापूर यांना दिनांक 04/02/2022 रोजी लेखी अर्ज केला होता. त्याप्रमाणे वीस दिवसापुर्वी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या सहीचे स्थायित्व प्रमाणपत्र मला कार्यालयातील वरिष्ठ लिपीक शेख यांनी दिले. त्यानंतर वरिष्ठ लिपीक शेख यांनी मला दि. 24/02/2023 रोजी माझे मोबाईल फोनवर फोन करून स्थायीत्व प्रमाणपत्र दिले म्हणून 5000/-रू.ची मागणी माझेकडे केली. त्यावेळी मी त्यांना माझा पगार झाला की पैसे देतो असे सांगीतले होते. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रारी अर्ज दिला. तसेच आज रोजी मी त्यांना भेटायला जाणार असलेचे सांगीतले.

त्यानंतर कुंभार साहेबांनी पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथील कार्यालयातुन करण्याचे आहे सांगीतले. कुंभार साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची सपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवुन त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर वरीष्ठ लिपीक शेख यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं.1 शुभांगी कांबळे यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि कुंभार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 असे अँन्टी करप्शन ऑफीस मधुन चालत सीपीआर हॉस्पीटल येथे गेलो तेथुन वरीष्ठ लिपीक बसत असलेल्या नर्मदा बिल्डींग मध्ये असलेल्या जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर गेले तेथे वरीष्ठ लिपीक शेख उपस्थित होते. मी त्यांना भेटलो त्यावेळी आमचेत स्थायीत्व प्रमाणपत्रा विषयी बोलणे झाले त्यानंतर शेख यांनी मला बिल्डींगचे खाली थांबणेस सांगीतले. त्यानंतर लगेचच ते खाली मला येवुन भेटले त्यावेळी वरीष्ठ लिपीक शेख यांनी मला स्थायीत्व प्रमाणपत्र दिले म्हणुन माझेकडे पाच द्यावे लागतील असे म्हणुन 5000/- रूपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी मला वरती सगळयांना हजार- हजार रूपये द्यावे लागतात असे म्हणुन बघा तमुच्या हिशोबाने द्या असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना दुपारनंतर पैसे आणुन देतो असे म्हणुन मी व पंच नं. 1 कांबळे असे अँन्टी करप्शन ऑफीसमध्ये परत आलो. तेथे त्यांनी मला व पंच 1 कांबळे यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली.

त्यानंतर वरीष्ठ लिपीक शेख यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 5000/- रूपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझेकडील पर्समध्ये ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने कुंभार साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 असे ऑफीसमधुन चालत सीपीआर हॉस्पीटल येथे

गेलो तेथुन पुढे नर्मदा बिल्डींग जवळ गेलो. तसेच आमचे पाठोपाठ कुंभार साहेब, पंच नं.2 जयशिलन स्वामी व सापळा पथक असे चालत आले. वरीष्ठ लिपीक काम करत असले नर्मदा बिल्डींगचे जवळ जिल्हा शल्य चिकीत्सक कार्यालयाजवळ येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर शेख यांनी सांगीतलेप्रमाणे त्यांना फोन करून मी नर्मदा बिल्डींगचे खाली थांबलेचे सांगीतले असता थोडयावेळाने शेख हे मी थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी मी, शेख यांना तुम्ही सांगीतलेप्रमाणे स्थायीत्व प्रमाणपत्राचे ते आणले आहेत असे म्हणुन 5000/- रूपये आणल्याचे सांगीतले. त्यावेळी ते दया दया असे म्हणाले त्यानंतर मी, वरीष्ठ लिपीक शेख यांना त्यांनी मागणी केलेप्रमाणे 5000/- रूपये दिले. त्यावेळी त्यांनी ते पैसे उजवे हाताने स्विकारून शर्टचे डावे खिशात ठेवले. त्यावेळी मी डावा हात डोक्यावरून फिरवुन पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच पोलीस निरीक्षक कुंभार साहेब, पंच नं.2 स्वामी व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन वरीष्ठ लिपीक शेख यांना पकडले.

त्यानंतर पो.नि.कुंभार यांनी माझे समक्ष वरीष्ठ लिपीक शेख यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव हुसेनबाशा कादरसाब शेख, वय 47 वर्षे, वरीष्ठ लिपीक, वर्ग - 3, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालय कोल्हापूर (सी.पी.आर) सध्या रा. नागोबा मंदिराचे मागे, शनिवार पेठ, कोल्हापूर मुळ रा. अ 195 कर्निक नगर, जिजामाता बागे जवळ, सोलापुर शहर, सोलापूर असे असल्याचे सांगितले. शेख यांचे कार्यालयात लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ऑफीस कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी मला नोकरीतील पुढील लाभ मिळणेकरिता स्थायित्व प्रमाणपत्राची आवश्यकता होती. त्याकरिता मी, मा. जिल्हा शल्यचिकित्सक सीपीआर रूग्णालय कोल्हापूर यांना लेखी अर्ज केला होता. त्याप्रमाणे जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या सहीचे स्थायित्व प्रमाणपत्र मला कार्यालयातील वरिष्ठ लिपीक शेख यांनी दिले म्हणुन त्यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 5000/- रूपयांची लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी हुसेनबाशा कादरसाब शेख, वय 47 वर्षे, वरीष्ठ लिपीक, वर्ग-3,छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालय कोल्हापूर (सी.पी.आर) सध्या रा. नागोबा मंदिराचे मागे, शनिवार पेठ, कोल्हापूर मुळ रा. अ 195 कर्निक नगर, जिजामाता बागे जवळ, सोलापुर शहर, सोलापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असून ती खरी असुन मी वाचुन पाहीली असता ती बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shrikrishna laxmanrao katakdhond(I (Inspector)) / pbmh79953 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

सुरेखा शिवाजी दुडयेकर

प्रत मिळाली.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): shrikrishna laxmanr
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pbmh79953